**<u>सं.फौ.ख.क्र.१४३४.२०२०</u>**

MHAU090029232020

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | २८.१२.२०२० |
| नोंदणी दिनांक | २९.१२.२०२० |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४.०५.२०२६ |
| कालावधी | ०५ व. ०४म. ०७दि. |

| | |
|---|---|
| | **<u>पैठण येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात</u>**<br>**(पीठासीन अधिकारी- श्री. एच.डी.देशिंगे)**<br>**(घोषीत दिनांक. ०४.०५.२०२६)**<br>**संक्षिप्त फौजदरी खटला क्रं.१४३४/२०२०, निशाणी क्रं.२७**<br>**गु.र.नं.२७५/२०२० पोलीस ठाणे पैठण** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियांग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. ए.आर.शिंदे |
| आरोपी | १. रावसाहेब देवराव गवळे,<br>वय – ५२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>२. सुषमा रावसाहेब गवळे,<br>वय – ४७ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>दोन्ही रा. इंदेगावं, ता. पैठण जि. औरंगाबाद. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री.आर.सी.बाबर. |

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक .०४.०५.२०२६)

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :**

दि.०३.०९.२०२० रोजी मौजे इंदेगांव येथे रात्री ११.१५ वा सुमारास विधीसंघर्ष बालकाने फिर्यादीच्या भोळसर मुलीच्या अंगावर वाईट हेतुने हात टाकुन तीचा विनयभंग केला. फिर्यादी ही आरोपी क्र. १ व २ यांना घटने बाबत सांगायला गेली असता आरोपींतांना संगनमत करुन फिर्यादीस मारहाण केली . त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरोधात कायदेशीर फिर्याद दिली.

२. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३५४, ३२३ सह कलम ३४ नुसार आरोप निश्चित केले. निश्चित केलेले आरोप आरोपींना वाचुन आणि समजावून सांगण्यात आल्याचे व आरोपींनी आरोप नाकबुल केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. त्यामुळे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांना तपासण्यात आले.आरोपी विरुध्द कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात इतपत पुरावा नसल्याने आरोपीचे निवेदन नोंदवले नाही.

३. हा खटला निकाली काढत असताना माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात. खालील चर्चित कारणास्तव मी त्या मुद्दांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर देत आहे.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०३.०३.२०२० रोजी ११.०० वा सुमारास मौजे इंदेगांव येथे आरोपीने विधीसंर्घग्रस्त बालकाने संगनमत करुन फिर्यादीची भोळसर मुलीच्या अंगावर वाईट हेतूने हात टाकून तिचा विनयभंग केला व भा.दं.वि.चे कलम ३५४ सह कलम ३४ चा गुन्हा केला ? | सिध्द केले नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | वरील दिवशी दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी फिर्यादीचा हात पिरघळून मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | आदेश काय ? | अंतीम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता :**

४. फिर्यादी साक्षीदार क्र.१ शांताबाई रंजित गवळी यांनी साक्षीत असे कथन केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. आरोपी हे त्यांचे शेजारी राहतात. त्यांच्या मुलाचे नाव राहुल आहे. त्यांच्या मुलीचे नाव कांता आहे व ती भोळसर आहे. १ वर्षापूर्वी ती मयत झाली. असे काही घडले नाही की, दि.०३.०३.२०२० रोजी ती व त्यांची मुलगी घरी असतांना आरोपीचा मुलगा राहुल याने त्यांच्या मुलीच्या अंगावर हात टाकल्याचे त्यांनी पाहिले त्याबाबत आरोपींना विचारणा केली असता दुसऱ्या दिवशी आरोपीने त्यांचा हात पिरगळून त्यांना मारहाण केली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय न केल्याने अभियोग पक्षातर्फे साक्षीदारास सूचक प्रश्न विचारल्यानंतर देखील अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देणारी साक्ष अभिलेखावर आलेली नाही.

५. आरोपीविरुध्द भा.दं.वि कलम ३५४ प्रमाणे दोषारोप निश्चित केलेला आहे. अभियोग पक्षाने फिर्यादीचा विनयभंग केला ही बाब सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाच्या वतीने एक साक्षीदाराची साक्ष नोंदवीली आहे परंतु साक्षीदाराने आरोपीने फिर्यादीच्या मुलीचा विनयभंग केला अथवा तसे कृत्य केले असे सांगितलेले नाही. फिर्यादीने देखील आरोपीने तिच्या मुलीच्या अंगावर हात टाकल्याचे व तिचा विनयभंग केल्याने या कारणावरुन तिने फिर्याद दिल्याचे सांगितले आहे. फिर्यादीच्या साक्षीतून तिच्या मुलीचा विनयभंग झाला अथवा तिच्या मन्नास लज्झा उत्पन्न होईल असे कृत्य आरोपीने केले असे सिध्द होत नाही. करिता मुदा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते. अभियोग पक्षाने

आरोपीविरुध्द निश्चित केलेला दोषारोप निसंशय पणे सिध्द केलेला नसल्याने आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. करिता मुददा क्र.३ चे उत्तर खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ रावसाहेब देवराव गवळे व आरोपी क्र.२ सुषमा रावसाहेब गवळे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ३५४, ३२३ सह कलम ३४ नुसार च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जमानत बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ च्या नुसार रुपये १५०००/-(पंधरा हजार) चे प्रत्येकी जामीन दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by HARIBHAU DASHARATH DESHINGE
Date: 2026.05.04 13:00:06 +0530

**(श्री. एच.डी.देशिंगे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**पैठण.**

**दिनांक – ०४.०५.२०२६**

**सं.फौ.ख.क्र.१४३४.२०२०**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द-नि-शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : कोमल विजयसिंग बायस (ग्रेड-३ लघुलेखक) |
| न्यायालयाचे नाव | : सह-दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पैठण. |
| आदेशाची तारीख | : ०४.०५.२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०४.०५.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : ०४.०५.२०२६ |